

# महाशिवरात्री यात्रा महोत्सव रुई नालकोल

**कडा :** आष्टी तालुक्यातील रुई नालकोल याठिकाणी महाशिवरात्री दरवर्षी विशेष उत्साह,भक्ती आणि भव्य आयोजनांसह साजरी केली जाते. महाशिवरात्री हा हिंदू धर्मातील अतिशय पवित्र सण आहे, जो भगवान शिव आणि देवी पार्वती यांच्या विवाहाचा आणि शिवाची आराधना करण्याचा दिवस म्हणून साजरा केला जातो.या दिवशी भक्त येणाऱ्या अंधकारावर प्रकाश,भक्तीवर समर्पणाचे स्मरण करतात.रुई नालकोल ठिकाणी महाशिवरात्री या दिवसापासून तीन दिवस यात्रा मोठ्या प्रमाणात भरली जाते व तीन दिवस विविध कार्यक्रम ठेवले जातात,


**कार्यक्रमाचे रूपरेषा :** रविवार दि.15 / 02 /2026 सकाळी आठ वाजता ज्योत सोहळा, सायंकाळी 9 ते 11वाजता ह.भ.प.प्राचीताई महाराज यांचे जाहीर कीर्तन सोमवार दि.16 / 02 / 2026 सायंकाळी 7 वाजता पालखी मिरवण व बॅन्जो, फाटक्याचे आतिषबाजी, हलगी पथक,संबळ पथक मिरवणूक मंगळवार दि.17 /02 /2026 सकाळी 9 वाजता आनंद लोकनाट्य तमाशा शो हजर्या कार्यक्रम , दुपारी 3 वाजता जंगी कुस्त्यांचा हंगाम, सायंकाळी 7 वाजता आनंद लोकनाट्य तमाशा शो, या सर्व कार्यक्रमासाठी रुई नालकोल पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी उपस्थित राहावे असे आव्हान ग्रामपंचायत कार्यालय रुई नालकोल व ग्रामस्थांकडून करण्यात आले आहे

## सोनाई कारखान्याचा 2700 रु प्रमाणे 1 ते 31जानेवारी 2026 या कालावधीत गेलेल्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या ऊसाचा पहिला हप्ता महेश बँकेत वर्ग!

**परळी वैजनाथ :** सोनाई अँग्रो कारखान्याचे चेअरमन प्रा.टी.पी.मुंडे सरांच्या



मार्गदर्शनाखाली कारखान्याचा 2700 रुपये प्रमाणे ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या ऊसाचा पहिला हप्ता दिनांक 1 जानेवारी ते 31 जानेवारी 2026 या कालावधीत कारखान्यास ऊस गेलेल्या शेतकऱ्यांचा ऊसाचा हप्ता महेश को-ऑपरेटिव्ह बँक शाखा परळी वैजनाथ येथे वर्ग करण्यात आल्याची माहिती कारखान्याचे व्हाईस चेअरमन आत्माराम कराड व संचालक प्रा. विजय मुंडे दिली आहे. कारखाना सुरू झाल्यापासून ते जानेवारी महिन्यापर्यंत शेतकऱ्यांच्या ऊसाचे बीले बँकेत वर्ग करण्यात आली आहेत त्यामुळे परिसरातील शेतकरी आनंद व्यक्त करत आहेत .तरी ऊस उत्पादक शेतकरी बांधवांनी आपली रक्कम महेश को-ऑपरेटिव्ह बँकेतून घेऊन जावी असे कारखान्याच्या वतीने कळविण्यात आले आहे.



## जिजाऊ ब्रिगेड आष्टी अध्यक्षपदी आशा करांडे शहराध्यक्षा म्हणून विद्या चव्हाण यांची निवड

**आष्टी :** मराठा सेवा संघ अंतर्गत आष्टी तालुका जिजाऊ ब्रिगेडची बैठक विभागीय उपाध्यक्ष सुवर्णाताई गिरे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच संपन्न झाली. या बैठकीमध्ये जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्षा शिवमती संगीता शिंदे यांनी आष्टी तालुका अध्यक्षा म्हणून शिवमती आशाताई करांडे यांची निवड केली. सदरचे नियुक्तीपत्र अध्यक्ष इंजि. तानाजी जंजिरे यांच्या हस्ते नुकतेच त्यांना देण्यात आले .व आष्टी- मुर्शदपुर शहरअध्यक्षा म्हणून शिवमती विद्याताई चव्हाण यांची निवड केली आहे. त्यांनाही नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी मराठा सेवा संघाचे अध्यक्ष इंजि. तानाजी बापू जंजिरे, लक्ष्मण रेडेकर, ॲड. सीताराम पोकळे, चौरे ताई यांची प्रमुख उपस्थिती होती. नवीन कार्यकारणी मध्ये माधुरी त व ले (उपाध्यक्ष), अर्चना पोकळे (उपाध्यक्ष), वर्षा शिंदे (सचिव), अनिता निंबोरे (कार्याध्यक्ष), संगीता पोकळे (सह कार्याध्यक्ष), प्रा. सायली हंबर्डे (प्रवक्ता), सुमित्रा गायकवाड (सह सचिव), शितल उदावंत ( कोषाध्यक्ष), मंगल साळवे (सह कोषाध्यक्ष), वर्षा ससाने (प्रसिद्धी प्रमुख), शैला करांडे (सहप्रसिद्धीप्रमुख), रत्नमाला (चाळक मार्गदर्शक). यावेळी कुसुम ढोबळे, पद्मिनी नरवडे, सत्यशीला ससाने, चांगुना जीवने, शोभा करांडे ,पुनम करांडे ,आशा कासवा आदी महिला भगिनी उपस्थित होत्या. तालुक्यातील कडा, धामणगाव, लोणी, खडकत, धानोरा, आदी प्रमुख गावांमध्ये व गावोगावी लवकरच जिजाऊ ब्रिगेडच्या शाखा स्थापन करण्यात येणार असल्याची माहिती नवनिर्वाचित अध्यक्ष शिवमती आशाताई करांडे यांनी दिली.

## संजय काळे यांची पोलीस उपनिरीक्षकपदी पदोन्नती

**परळी :** परळी येथील लोहमार्ग पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले सह्यायक पोलीस



उपनिरीक्षक संजय काळे यांची पोलीस उपनिरीक्षक पदावर पदोन्नती झाली असून या पदोन्नती निमित्ताने त्यांचा लोहमार्ग पोलीस ठाणे परळी येथे सत्कार करून खांद्यावर स्टार वाढविण्यात आला आहे. अनेक वर्षांपासून लोहमार्ग पोलिसांत कार्यरत असलेली संजय काळे हे कर्तव्यदक्ष, निष्कलंक व्यक्तिमत्त्व असून नुकताच पोलीस अधीक्षक कार्यालय लोहमार्ग पोलीस संभाजी नगर यांनी परळी येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय काळे यांच्यासह संभाजी नगर विभाग अंतर्गत इतर 7 पोलीस अधिकारी यांचे पदोन्नतीचे आदेश पारित केले. या आदेशानव्ये संजय काळे यांची पोलीस उपनिरीक्षक पदावर पदोन्नती होत लोहमार्ग पोलीस ठाणे परळी येथेच नियुक्ती देण्यात आलेली आहे. संजय काळे यांच्या या पदोन्नती निमित्ताने रविवार दि 15 रोजी पोलीस ठाण्यात सत्कार करत गणवेशवर स्टार लावण्यात आला. या प्रसंगी ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ वाघमोडे यांच्यासह इतर कर्मचारी, काळे कुटूंबिय उपस्थित होते.

## वाचनालय लोकार्पणाची क्षणचित्रे आदरणीय पंकजा व धनंजयजी मुंडे यांच्या समवेत





डॉ.भालचंद्र वाचनालयाचा आज उद्घाटन प्रसंगी राज्याच्या पर्यावरण तथा पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजा मुंडे, माजी मंत्री तथा लोकप्रिय आ. धनंजय मुंडे ,नगराध्यक्षा सौ. पद्मश्री धर्माधिकारी,शिक्षण सभापती योगाश मेनकुदळे,प्रा.शंकरअण्णा कापसे, अनंत इंगळे सह सर्वांनी वाचनालयाची अधिकृत मासीक फीस 50 रु प्रमाणे एका वर्षाचे 600 रु व सुरक्षा अनामत 500 रु असे एकुण 1100 रु प्रमाणे फीस भरून अधिकृत सभासद झालोत.आपणही सभासद व्हा,वाचन संस्कृती वाढवा हि विनंती. **वाचाल तर वाचाल!**

# सद्गुरु सेवालाल महाराज हे थोर समाजसुधारक आणि क्रांतिकारी संत : आमदार सुरेश धस

## संत सेवालाल महाराज जयंती २०२६ उत्साहात संपन्न ; १३ तांड्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**आष्टी | प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील देऊळगाव घाट लमाण तांडा येथे सद्गुरु सेवालाल महाराज जयंती २०२६ विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी उत्साहात संपन्न झाली. तमाम गोर बंजारा बांधव तसेच तालुक्यातील १३ तांड्यांच्या वतीने आयोजित या सार्वजनिक जयंती उत्सवात मोठ्या संख्येने समाजबांधव सहभागी झाले होते.

यावेळी आष्टी विधानसभेचे भाजप आमदार सुरेश धस म्हणाले की, संत सेवालाल महाराज हे १८व्या शतकातील महान संत व समाजप्रबोधनकार होते. त्यांनी बंजारा समाजातील अंधश्रद्धा, मद्यपान, अन्याय व कुप्रथांविरुद्ध ठाम भूमिका घेत समाजाला शिक्षण, एकता व स्वाभिमानाचा मार्ग दाखवला. तांड्यांना स्थैर्य देणे, शेती व संघटनासाठी प्रेरणा देणे, स्त्रियांचा सन्मान राखणे तसेच जलसंधारण,प्राणीसंवर्धन व पर्यावरण संरक्षणाचा संदेश देणे ही त्यांची प्रमुख कार्ये होती. सत्य, नैतिकता आणि समाजहित यांवर आधारित जीवन जगण्याचा त्यांनी दिलेला उपदेश आजही तितकाच मार्गदर्शक आहे. “सद्गुरु सेवालाल महाराज हे थोर समाजसुधारक आणि क्रांतिकारी संत म्हणून पूजले जातात,” असे प्रतिपादन त्यांनी केले.



सावरगाव फाटा ते लमाणतांडा, देऊळगाव (घाट) या मार्गावर भव्य मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर मूर्तीपूजन व भोग भंडारा पार पडला. बंजारा समाजाच्या समृद्ध परंपरेचे दर्शन घडविणारी पारंपरिक सांस्कृतिक नृत्ये सादर करण्यात आली.

आमदार धस यांनी बंजारा भाषेत संवाद साधत बांधवांशी आत्मीयतेने संवाद साधला. “शिक्षण, एकता आणि स्वाभिमान हा आपल्या प्रगतीचा खरा मार्ग आहे. संत सेवालाल महाराजांचे विचार आचरणात आणल्यास समाज अधिक सक्षम व सुसंघटित बनेल,” असे ते म्हणाले. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी एकजुटीने कार्य करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

ते पुढे म्हणाले की, संत सेवालाल महाराज हे केवळ बंजारा समाजापुरते मर्यादित नसून सर्व समाजाचे दैवत आहेत. नागपूरला जाताना आपण आवर्जून पोहरादेवी तीर्थक्षेत्र येथे दर्शन घेतो व मुक्काम करतो. पोहरादेवी हे आपल्या सर्वांसाठी काशीप्रमाणे पवित्र स्थान आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकाळात पोहरादेवी तीर्थक्षेत्राचा सर्वांगीण विकास झाला असून विशेष निधी व महत्त्वपूर्ण निर्णयांमुळे या परिसराचा कायापालट झाला आहे. पोहरादेवीला आंतरराष्ट्रीय दर्जाचे तीर्थक्षेत्र बनविण्याची दिशा देण्याचे काम मुख्यमंत्री फडणवीस यांनीच केले असून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना देखील या ठिकाणी आणून उद्घाटन केले आहे असेही त्यांनी नमूद केले.

या प्रसंगी रावसाहेब शिरसाट, अशोक इथापे, रमेश तांदळे, राजेंद्र मस्के, भरत जाधव, मोहन आमटे, बंडू तळेकर, बबलू शेठ कुरेशी, महादेव थोरात, नवनाथ गव्हाणे, अशोक दहातोंडे, संतोष वायभासे, सुरेश माळी, गणेश वायभासे, जावेद शेख, साबळे साहेब, गोटीराम कोहक आदी मान्यवर उपस्थित होते.

यावर्षी जयंती उत्सवानिमित्त आमदार सुरेश धस यांच्या वतीने महापंक्तीचे आयोजन करण्यात आले. महाप्रसादासाठी महापंगत देत अन्नदाता म्हणून सेवा बजावण्यात आली. संत सेवालाल महाराजांच्या चरणी विनम्र अभिवादन करून सामाजिक ऐक्य व परंपरेचा उत्सव ठरलेल्या या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

### ■ आमदार सुरेश धस यांनी बंजारा समाज बांधवांशी बंजारा भाषेत साधला संवाद

संत जयंती सोहळ्यात आष्टी विधानसभेचे आमदार सुरेश धस यांनी बंजारा समाज बांधवांशी थेट बंजारा भाषेत संवाद साधत आत्मीयतेने भाषण केले.

यावेळी भाषण करताना त्यांनी सद्गुरु सेवालाल महाराज यांच्या शिकवणीचा उल्लेख करत आमदार सुरेश धस यांनी संत सेवालाल महाराजांचे उपदेश बंजारा भाषेत मांडत समाज बांधवांशी थेट संवाद साधला. त्यामुळे उपस्थितांमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. आपल्या मातृभाषेत संवाद साधल्याने समाजबांधवांमध्ये आत्मीयता आणि आपलेपणाची भावना अधिक दृढ झाली.

# आएएमए लातूर द्वारा सांस्कृतिक कला महोत्सवाचे आयोजन

## लातूरने कलाक्षेत्रात आंतरराष्ट्रीय दर्जाचे ख्यातनाम कलाकार घडविले – उदघाटक डॉ .राजेश इंगोले

## लातूर हे गुणवंतांची खाण – खासदार डॉ .शिवाजीराव काळगे

**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

इंडियन मेडिकल असोसिएशन, लातूर द्वारा सांस्कृतिक कला महोत्सव नुकताच दयानंद हॉल येथे आयोजित करण्यात आला होता.

यावेळी सांस्कृतिक कला मंचावर उद्घाटक म्हणून इंडियन मेडिकल असोसिएशनचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले तर प्रमुख पाहुणे म्हणून लातूरचे खासदार सुप्रसिद्ध नेत्ररोग तज्ज्ञ डॉ.शिवाजीराव काळगे व उपाध्यक्ष डॉ.कल्याण बरमदे हे होते. यावेळी कला मंचावर लातूर आयएमएचे स्थानिक अध्यक्ष डॉ.अभय कदम, सचिव डॉ.ऋषिकेश हरिदास, महिला अध्यक्ष डॉ.ज्योती सुळ व महिला सचिव डॉ.प्रियंका डावळे यांची प्रमुख उपस्थिती होती. सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरूवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलन व नटराज मूर्ती पूजनाने झाली. आपल्या उद्घाटकीय भाषणात बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनी लातूर येथे आलो की छत्रपती शाहू कॉलेजची आठवण होते, दिवंगत लोकनेते विलासरावजी देशमुख साहेबांची आठवण होते, जगप्रसिद्ध अशा सिद्धेश्वर यात्रेची आठवण होते असे म्हणतं लातूरच्या या भूमीने शैक्षणिक क्षेत्रात तर गुणवत्ताधारक दिलेचं परंतु, सांस्कृतिक कलाक्षेत्रातही दिग्गज असे जगप्रसिद्ध कलाकार घडविले. त्यामुळे कलेचा हा समृद्ध वारसा लातूर मधील डॉक्टरांना कलेचा वारसा जन्मजात हक्काने मिळाला असल्याचे सांगत येथील डॉक्टरांच्या अंगी सांस्कृतिक कला ही वारसा हक्काने मिळाली असल्याचे नमूद केले. अनेक डॉक्टरांमध्ये विविध कलाकार लपलेले असतात कुणी गायक असतो, कुणी कवी असतो, कुणी लेखक असतो, कुणी उत्कृष्ट नृत्य करतो, कुणी उत्कृष्ट फोटोग्राफी करतो, कुणी उत्कृष्ट चित्र काढतो आणि या अशा डॉक्टरांमधील कलाकार समाजापुढे आणण्यासाठी लातूर आयएमएची शाखा सदोदित कार्यरत असते या गोष्टींचा सांस्कृतिक समितीचा अध्यक्ष म्हणून मला नेहमीच कौतुक



आणि गर्व वाटतो या शब्दांत लातूर आयएमएच्या या सांस्कृतिक कार्यक्रमाचे डॉ.राजेश इंगोले यांनी कौतुक केले. पैसा हा कदाचित जीवन जगण्यासाठी मदत करतो. परंतु, जीवनाला अर्थ प्राप्त करून देण्यासाठी आणि जीवनामध्ये प्रमोद्च्य सुख समाधान मिळण्यासाठी एखादी कला प्रत्येक व्यक्तीच्या अंगात जिवंत असणे गरजेचे आहे. कारण, ती कला त्याला जीवन सुंदर पद्धतीने कसं जगायचं हे सतत शिकवत असते. त्यामुळे प्रत्येक डॉक्टरांनी आपल्या या दैनंदिन धकाधकीच्या आयुष्यात आपल्या अंगातील कलेला अंतर न देता त्या कलेचा उपयोग आपल्या जीवनातील ताण तणाव विसरण्यासाठी स्ट्रेस बस्टर म्हणून करावा असे मत डॉ.राजेश इंगोले यांनी यावेळी व्यक्त केले. यावेळी बोलताना खासदार शिवाजीराव काळगे यांनी महाराष्ट्रातील डॉक्टर्स कलाकार हे आपल्या प्रतिभेला वाव देत नाहीत. मात्र लातूर मधील डॉक्टर हे एका वेगळ्या धाटणीचे कलाकार असल्याने ते आपल्या कलेला वाव देतात आणि आपल्या छंदांना चांगल्या पद्धतीने जोपासतात. हे लातूरच्या डॉक्टरांचे आगळे वेगळेपण आहे या शब्दात डॉक्टर्स कलावंतांचा कौतुक केल. डॉक्टरांच्या विविध समस्या प्रश्न सोडविण्यासाठी खासदार म्हणून मी कटिबद्ध असल्याचे आश्वासन देत डॉक्टरांसाठी एक वेगळ्या प्रकारचा कला महोत्सव यापुढे सांस्कृतिक समितीचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांच्या सहकार्याने आपण आयोजित करून असे आश्वासन उपस्थित डॉक्टरांना दिले. आयएमए लातूरचे अध्यक्ष डॉ.अभय कदम यांनी इंडियन मेडिकल असोसिएशन लातूर सातत्याने हा सांस्कृतिक कला महोत्सव गेल्या अनेक वर्षांपासून आयोजित करीत आहे. लातूर मधील सर्व डॉक्टर्स त्याला उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देतात व आपल्या कला या सांस्कृतिक कला मंचावर सादर करतात त्यामुळे असे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यासाठी आम्हाला प्रेरणा मिळते व हा कलेचा उत्सव यापुढेही असाच कायम ठेवणार असल्याचे सुतवाच केले. लातूर आयएमएच्या महिला अध्यक्ष डॉ.ज्योती सूळ यांनी लातूर आयएमए वुमन्स विंग्स व स्थानिक शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर मधील कलाकार डॉक्टर साठी हा सांस्कृतिक कला मंच मागील अनेक वर्षांपासून संघटनेने निर्माण करून दिला आहे. या कार्यक्रमांमध्ये सहभागी डॉक्टरची संख्या सातत्याने वाढत आहे आणि अनेक डॉक्टर्स या सांस्कृतिक कला उत्सवाची वाट पाहत असतात असे आवर्जून सांगितले. यावेळी इंडियन मेडिकल असोसिएशनच्या सांस्कृतिक समिती द्वारे घेतलेल्या राज्यस्तरीय सांस्कृतिक स्पर्धांमध्ये पारितोषिके मिळविलेल्या डॉ.मोहिनी गानू, डॉ.अशोक गानू, डॉ.अशोक आरदवाड, डॉ.राजेश्री सावंत, डॉ.अमित उटीकर, डॉ.स्वप्ना उटीकर, डॉ.निलेश नागरगोजे यांचा समितीचे राज्याध्यक्ष डॉ.राजेश इंगोले, डॉ.शिवाजी काळगे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.बालाजी सुळ यांनी केले तर उपस्थितांचे आभार डॉ.ऋषिकेश हरिदास यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सर्व स्थानिक पदाधिकाऱ्यांनी प्रयत्न केले.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)



## चनई ग्रामपंचायतीत बीड हायवेवर राजमाता जिजाऊंच्या पुतळ्याचे अनावरण

**अंबाजोगाई :** चनई ग्रामपंचायतीच्या वतीने बीड हायवेवर राजमाता जिजाऊ यांच्या भव्य पुतळ्याची प्रतिष्ठापना करण्यात आली. या ऐतिहासिक क्षणामुळे ग्रामस्थांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, परिसरात देशभक्ती आणि प्रेरणेची भावना दाटून आली. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून शिवमती राधाताई रामदास सपकाळ जिजाऊ ब्रिगेड जिल्हाध्यक्ष बीड उपस्थित होत्या तसेच अनिल शिंदे चनई उपसरपंच ,प्रभाकर सावरे, सरपंच पती प्रवीण कदम, ग्रामपंचायत सदस्य यांच्यासह गावातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी दत्ता भाऊ सावरे, गायकवाड मामा, विलास सावरे, विजय सावरे, निखिल कदम, बिरुदेव गोचडे तसेच इतर गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती. सर्वांच्या उपस्थितीत पुतळ्याचे पूजन व अभिवादन करण्यात आले. राजमाता जिजाऊंच्या कार्यातून प्रेरणा घेऊन समाजात आदर्श घडविण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन ग्रामपंचायत चनई व ग्रामस्थांच्या सहकार्याने करण्यात आले.




## महापौर यांची पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारक कामास भेट

**नांदेड :** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या महापौर सौ.कविता संतोष मुळे यांनी आज शहरातील माता गुजरीजी विसावा उद्यान परिसरात उभारण्यात येत असलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या भव्य स्मारकाच्या कामाला भेट देऊन कामाच्या प्रगतीचा आढावा घेतला. या ठिकाणी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची भव्य पूर्णाकृती ब्रॉन्झ मूर्ती बसवण्यात येणार आहे. या स्मारकासाठीची मुख्य मूर्ती घडवण्याची जबाबदारी प्रख्यात मूर्तिकार पद्मभूषण राम सुतार यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. महापौरांनी स्मारकाच्या चौथऱ्याचे बांधकाम आणि परिसरातील सुशोभीकरणाच्या कामाची पाहणी केली. हे स्मारक राजमाता अहिल्यादेवींच्या सेवाभाव, न्यायप्रियता आणि लोककल्याणकारी नेतृत्वाची आठवण करून देणारे ठरेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. सदरील कामाची किंमत रु.१० कोटी असून यास शासनाची मान्यता प्राप्त आहे. कामाचे कंत्राटदार एल अँड एस कन्स्ट्रक्शन नांदेड यांना देण्यात आले असून सद्यस्थिती काम प्रगतिपथावर आहे. स्मारकाचे काम विहित वेळेत आणि उच्च गुणवत्तेसह पूर्ण करण्याचे निर्देश महापौरांनी संबंधित कंत्राटदार व मनपाच्या अभियंत्यांना दिले. याप्रसंगी महानगरपालिकेचे सभागृह नेते महेश कनकदंडे, महापौर प्रतिनिधी संतोष मुळे, शहर अभियंता सुमंत पाटील, उपअभियंता खुशाल कदम, कनिष्ठ अभियंता सुप्रिया मुलंगे यांची उपस्थिती होती.

## सिरसाळा येथे भव्य १०१ शिवस्मारक यात्रेचे स्वागत होणार

**सिरसाळा (अतुल बडे) :** धर्मवीर छत्रपती संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठान, महाराष्ट्र यांच्या वतीने आयोजित भव्य १०१ शिवस्मारक यात्रा राज्यातील विविध भागांतून



मार्गक्रमण करत असून या यात्रेचे सिरसाळा येथे जल्लोषात व भव्य स्वागत करण्यात येणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज व धर्मवीर संभाजी महाराज यांच्या शौर्य, त्याग आणि स्वराज्याच्या विचारांचा प्रसार करण्याच्या उद्देशाने ही यात्रा काढण्यात आली आहे. सिरसाळा नगरीत यात्रेच्या स्वागतासाठी सर्व शिवप्रेमी, युवक, महिला व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असून स्वागताची जय्यत तयारी सुरू असल्याची माहिती आयोजकांनी दिली. यावेळी घोषणाबाजी, ढोल-ताशांच्या गजरात तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून यात्रेचे स्वागत करण्यात येणार आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन चविष्ट वानखेडे, दत्तात्रय गव्हाणे,सुमंत उंबरे,राम किरवंत बाबा सोनवणे,माउली मुठाळ,रणजित मुठाळ,अर्जुन काळे, आयोजकांकडून करण्यात आले आहे.



## महापालिकेत “संत सेवालाल महाराज” यांची जयंती साजरी

**नांदेड :** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या वतीने दि.१५ फेब्रवारी २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता मुख्य प्रशासकीय इमारत,स्थायी सभागृह कक्ष, येथे महापौर सौ.कविता संतोष मुळे यांच्या हस्ते “संत सेवालाल महाराज” यांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. संत सेवालाल महाराज हे बंजारा (गोर) समाजाचे थोर आध्यात्मिक गुरू, समाजसुधारक आणि आद्यदैवत मानले जातात. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजातील अंधश्रद्धा निर्मूलन आणि निसर्गाच्या रक्षणासाठी समर्पित केले. महाराजांना आयुर्वेद आणि निसर्गोपचाराचे सखोल ज्ञान होते, ज्याचा वापर त्यांनी लोकांचे आजार दूर करण्यासाठी केला. त्यांच्या कार्यामुळेच विखुरलेला बंजारा समाज संघटित झाला आणि मुख्य प्रवाहात आला. याप्रसंगी सहाय्यक आयुक्त मो. गुलाम सादिक, जनसंपर्क अधिकारी सुमेध बनसोडे, स्विय सहाय्यक महेश आसने, साईराज मुदिराज, वरिष्ठ लिपिक शुभांगी चौधरी, साईनाथ कोनेरवार, सुजातअली यांच्यासह मनपाच्या इतर कर्मचाऱ्यांची यावेळी मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# मधुमेह तज्ञ डॉ .अतुल शिंदे यांना डायबिटीज इंडिया संस्थेचा राष्ट्रीय स्तरावरील डायबिटीज इनिशिएटिव्ह अवार्ड – 2026 पद्मश्री डॉ .शशांक जोशी यांच्या हस्ते हैदराबाद येथे प्रदान

**अंबाजोगाई/प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहरात गेल्या 13 वर्षापासून अखंडित व अविरतपणे मधुमेही रुग्णांची सेवा करणाऱ्या डॉ. अतुल शिंदे यांना राष्ट्रीय स्तरावर मधुमेही रुग्णांसाठी काम करणाऱ्या डायबिटीज इंडिया संस्थेच्या वतीने राष्ट्रीय स्तरावरील डायबिटीज अवेरनेस इनिशिएटिव अवॉर्ड - 2026 नुकताच जाहीर करण्यात आला होता त्याचे वितरण शुक्रवार दि.13 फेब्रुवारी 2026 रोजी हैदराबाद येथे मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. डॉ.अतुल शिंदे यांचे मधुमेह क्षेत्रातील कार्य हे अतुलनीय ठरल्याने त्यांचा सन्मान करण्यात आला त्यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

डॉ.अतुल शिंदे यांनी १३ वर्षांपूर्वी वैद्यकीय शिक्षण घेऊन अंबाजोगाई शहरातील प्रशांत नगर भागात योगेश्वरी डायबिटीज केअर सेंटर या नावाने पायाभरणी केली. 13 वर्षाची अखंड मेहनत व मधुमेही रुग्णांना सातत्याने केलेले समुपदेशन यामुळे रुग्णांमध्ये मधुमेह रोखण्यात मोठ्या प्रमाणात यश आले. डॉ.अतुल शिंदे हे केवळ एवढ्यावर थांबले नाहीत तर दरवर्षी मधुमेह दिनानिमित्ताने अंबाजोगाई तालुका व परिसरातील जे गोरगरीब व मध्यमवर्गीय रुग्ण आहेत त्यांच्यासाठी मोफत रक्त तपासणी, मोफत उपचार आणि मोफत औषधी दिली जातात.गेल्या तेरा वर्षात हजारो रुग्णांना डॉ. शिंदे यांच्यामुळे मधुमेह नियंत्रणात




आणण्यात यश आले आहे. वैद्यकीय सेवेसोबतच निस्वार्थपणे गरीब रुग्णांना मोफत सेवा ते देत असतात. मधुमेह आजारासंबंधी आपल्या परीने ते जनजागृती करत असतात. त्यासोबतच शहर व परिसरातील जी गावे आहेत त्या गावांमध्ये वेगवेगळे सण, उत्सव व महामानवांच्या जयंती आणि पुण्यतिथीच्या निमित्ताने आयोजित शिबिरांमध्ये उपस्थिती लावून रुग्णांना दिलासा देण्याचे काम करतात.मधुमेह आजारासंबंधी कमालीचे जागरूक असलेल्या डॉ .अतुल शिंदे यांच्या कामाचे सर्व स्तरातून कौतुक होत असते परंतु मधुमेहाच्या बाबतीत राष्ट्रीय स्तरावर काम करणाऱ्या डायबेटीज इंडिया या संस्थेने डॉ.अतुल शिंदे यांच्या निस्वार्थ कार्याचा अभ्यास करून त्यांना राष्ट्रीय स्तरावरचा डायबिटीज अवेरनेस इनिशिएटिव अवॉर्ड - 2026 नुकताच जाहीर करण्यात आला होता. त्याचे वितरण शुक्रवार दि.13 फेब्रुवारी 2026 रोजी हैदराबाद येथे भारतातील मधुमेह विषयात ज्यांचे भरीव कार्य आहे व ज्यांना मधुमेह विषयातील कामगिरी बाबत भारत सरकारचा पद्मश्री हा किताब मिळालेला आहे असे डॉ.शशांक जोशी व आंतरराष्ट्रीय डायबेटीज फेडरेशनच्या अध्यक्ष डॉ.निती पॉल यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. याप्रसंगी देशभरातील व आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामांकित मधुमेही तज्ञ डॉक्टर मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती.डॉ. अतुल शिंदे यांना मिळालेला पुरस्कार हा खऱ्या अर्थाने त्या गोरगरीब व सर्वसामान्य रुग्णांची केलेल्या मोफत सेवेची पावती आहे अशी भावना त्यांच्या सर्व सहकाऱ्यांची आहे. मराठवाडा विभागातून हा राष्ट्रीय स्तरावरचा पुरस्कार मिळवणारे एकमेव मधुमेह तज्ञ डॉ . अतुल शिंदे हे एकमेव आहेत. अंबाजोगाई शहरात गेल्या 13 वर्षापासून आपल्या वैद्यकीय सेवेतून गोरगरीब व तळागाळातील आबाल वृद्ध व लहान वयातील मधुमेह रुग्णांना दिलासा देण्याचे काम त्यांच्या हातून झाले आहे. वैद्यकीय सेवे सोबतच संशोधन, प्रशिक्षण व समाजाभिमुख उपक्रमांद्वारे असंख्य रुग्णांचे जीवनमान त्यांच्यामुळे उंचावले आहे.मधुमेहींच्या आरोग्यासाठी जनजागृती निर्माण करण्यासाठी त्यांनी विविध व्यासपीठावरून प्रभावी मार्गदर्शन सातत्याने केले आहे. त्यांच्या उल्लेखनीय कार्यातून समर्पण, उत्कृष्टता आणि समाजसेवेची प्रेरणा इतरांना मिळत असते.त्यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल मराठवाडा विभागातील विविध क्षेत्रातील मान्यवर, नागरिक, रुग्ण व संस्था पदाधिकारी यांनी अभिनंदन केले आहे.

## आष्टीत महाशिवरात्री निमित्त तीन दिवसीय महोत्सव उत्साहात आ . सुरेश धस यांनी भक्तांच्या रांगेत उभं राहून घेतले पिंपळेश्वरांचे दर्शन



**आष्टी (प्रतिनिधी)**

श्री क्षेत्र पिंपळेश्वर महादेव देवस्थान मंदिरात महाशिवरात्री उत्सवानिमित्त तीन दिवसीय महोत्सव मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात पार पडला. या महोत्सवाचे आयोजन श्री पिंपळेश्वर महादेव देवस्थान ट्रस्ट, श्री पिंपळेश्वर देवस्थान समिती आष्टी तसेच समस्त ग्रामस्थ आष्टी मुर्शदपुर यांच्या वतीने करण्यात आले होते.

उत्सव काळात दररोज अभिषेक, महाआरती व दैनंदिन महाआरतीचे आयोजन करण्यात आले. तसेच कीर्तन केसरी ह भ प ज्ञानेश्वर महाराज कोठुळे भिवंडीकर यांचे प्रभावी कीर्तन पार पडले. त्यांच्या कीर्तनातून उपस्थित भाविकांना अध्यात्मिक मार्गदर्शन लाभले.

उत्सवाची सांगता भव्य शोभायात्रेने झाली. या शोभायात्रेत सुमारे अडीचशे वारकरी मुला-मुलींच्या टाळ-मृदंग भजनी मंडळ पथकाने सहभाग घेतला होता. ‘हर हर महादेव’च्या जयघोषात संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. मराठवाडा भूषण लोकनेते सुरेश धस यांनी मंदिरात उपस्थित राहून पिंपळेश्वरांचे दर्शन घेतले व भाविकांशी संवाद साधला. महाशिवरात्रीनिमित्त आष्टी मुर्शदपूर परिसरासह तालुक्यातील लाखो भाविकांनी यावेळी दर्शनाचा लाभ घेतला. तीन दिवसीय महाशिवरात्री महोत्सवामुळे आष्टी शहरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते.




## महापशुधन एक्सपोमध्ये वैद्यनाथ मिल्क अॅण्ड मिल्क प्रॉडक्ट्सला ग्राहकांची उत्स्फूर्त पसंती

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

परळी तालुका दूध व्यवसायिक संघ मर्या., परळी वैजनाथ यांच्या संचलनाखाली कार्यरत असलेल्या वैद्यनाथ मिल्क अॅण्ड मिल्क प्रॉडक्ट्सच्या दर्जेदार उत्पादनांना सध्या सुरू असलेल्या महा पशुधन एक्सपो प्रदर्शनात ग्राहकांची जोरदार पसंती मिळत आहे. स्थानिक पातळीवर शुद्धता, दर्जा आणि विश्वास या तत्त्वांवर उभारलेला हा ब्रँड आता प्रदर्शनातही आपली वेगळी छाप पाडताना दिसत आहे.

परळी-वीड हायवेवरील गट क्र. ५२, लिंबुटा पोस्ट पांगरी कॅम्प येथे कार्यरत असलेल्या या डेरी उद्योगाने स्थानिक शेतकरी व दूध उत्पादकांना जोडत गुणवत्तापूर्ण दुग्धजन्य पदार्थांची निर्मिती केली आहे. प्रदर्शनातील गाळा क्रमांक B-35 येथे ग्राहकांची मोठी गर्दी होत असून उत्पादनांची चव व गुणवत्ता यांचे विशेष कौतुक होत आहे.

■ **दर्जेदार उत्पादनांची विस्तृत श्रेणी**

वैद्यनाथ मिल्क अॅण्ड मिल्क प्रॉडक्ट्सकडून खालील उत्पादने उपलब्ध आहेत.

दूध, खवा, दही, ताक, लस्सी, बासुंदी, पनीर, श्रीखंड, आम्रखंड, तुप, क्रिम या सर्व उत्पादनांमध्ये शुद्धता आणि पारंपरिक चव यांचा संगम असल्याने ग्राहकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.

सदर डेरी उद्योग हा भगवान सेनेचे सरसेनापती फुलचंद कराड तथा शिवसेना (एकनाथ शिंदे गट)चे महाराष्ट्र समन्वयक यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असून स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याबरोबरच ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्याचे कामही करत आहे.

परळी वैजनाथ शहरातील स्थानिक उद्योग म्हणून ओळख असलेल्या या संस्थेला महा पशुधन एक्सपोमध्ये मिळालेल्या प्रतिसादामुळे भविष्यात विस्ताराच्या नव्या संधी उपलब्ध होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

संपर्कासाठी: 93739 48799 / 95271 29000 / 98607 13505 पत्ता: गट नं. ५२, लिंबुटा पोस्ट, पांगरी कॅम्प (परळी-वीड हायवे), ता. परळी वैजनाथ, जि. बीड येथे तसेच महापशुधन एक्सपोला भेट देणाऱ्या नागरिकांनी गाळा क्रमांक B-35 येथे अवश्य भेट देऊन स्थानिक दर्जेदार उत्पादनांचा आस्वाद घ्यावा असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

■ **महाशिवरात्रीनिमित्त शिवभक्तांना फराळाचे वाटप**

भगवान सेनेचे सरसेनापती तथा शिवसेना शिंदे गटाचे महाराष्ट्र राज्याचे समन्वयक फुलचंद कराड यांच्या वतीने प्रभुवैद्यनाथाच्या नगरीत येणाऱ्या शिवभक्त तसेच भाविकासाठी राजगिरे चे लाडू तसेच साबुदाणा खिचडीचे वाटप करण्यात येणार आहे. या फराळाचा सर्व भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन संयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे.

## संत सेवालाल महाराजांच्या नावाने वाशिम वैद्यकीय महाविद्यालयास नामकरण; शासनाच्या निर्णयाचे स्वागत

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

श्री संत भगवान सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र शासनाने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, वाशिम यास “संत सेवालाल महाराज वैद्यकीय महाविद्यालय” असे नाव देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. या निर्णयाचे विविध स्तरांतून स्वागत होत असून समाजात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



संत सेवालाल महाराजांनी समता, सेवा, त्याग आणि राष्ट्रनिष्ठेचा दिलेला संदेश आजही प्रेरणादायी मानला जातो. त्यांच्या नावाने वैद्यकीय शिक्षणसंस्था ओळखली जाणे ही केवळ नामांतराची बाब नसून समाजाच्या आत्मसन्मानाचा गौरव असल्याची भावना व्यक्त होत आहे. या निर्णयामुळे संतांच्या कार्याला अभिवादन करण्याची आणि त्यांच्या विचारांना पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्याची मोठी संधी उपलब्ध झाली आहे. या पार्श्वभूमीवर अनिल नामदेव चव्हाण, परळी वैजनाथ येथील अशासकीय सदस्य तथा बंजारा समाजाचे प्रतिनिधी, यांनी शासनाच्या निर्णयाचे स्वागत करून मनःपूर्वक आभार व्यक्त केले आहेत. “हा निर्णय समाजासाठी अभिमानास्पद असून संत सेवालाल महाराजांच्या कार्याला योग्य तो मान मिळाल्याची भावना निर्माण झाली आहे. भविष्यातील पिढ्यांना त्यांच्या विचारांची प्रेरणा मिळत राहील,” असे त्यांनी नमूद केले.

शासनाच्या या निर्णयामुळे बंजारा समाजात समाधान आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाल्याचेही त्यांनी सांगितले.



## डॉ.विक्रांत अनुराधा शिवदास विधाते यांची मुंबई येथील के.बी. भाभा हॉस्पिटलमध्ये जनरल सर्जरी (डीएनबी) साठी निवड

**आष्टी (प्रतिनिधी)**

आष्टी येथील शेतकरी शिक्षण संस्थेचे प्रशासन अधिकारी प्रा. शिवदास विधाते यांचे सुपुत्र आणि कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.हरिदास विधाते यांचे पुतणे

डॉ.विक्रांत विधाते

यांची मुंबई येथील के.बी.भाभा हॉस्पिटलमध्ये जनरल सर्जरी (डीएनबी) साठी निवड झाली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल माजी आ.भीमराव धोंडे यांनी सत्कार करून पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी ज्येष्ठ नेते लालाभाऊ कुमकर, राजेंद्र धोंडे, अजय धोंडे,अभय धोंडे, डॉ.डी.बी.राऊत, संजय शेंडे,संदीप ननवरे,प्राचार्य सुनील कोल्हे,इंजि. बाळासाहेब भुकन, उत्तम बोडखे, प्राचार्य डॉ.चंद्रकांत गोसावी,शिवाजी टेकाडे,प्रा.आर.जी. विधाते, सुदर्शन धोंडे, माऊली बोडखे, प्राचार्य श्रीराम आरसूळ, प्राचार्य संजय बोडखे, सेवानिवृत्त प्राचार्य अशोक टेकाडे,शिवशंकर टेकाडे, प्रा.अशोक खेडकर, रमेश गिरी, सुभाष वाघ,प्रा. राम बनसोडे,उद्धव विधाते,भगवान विधाते,विश्वजीत विधाते,डॉ. सत्यजित विधाते, अशोक विधाते, नवनाथ विधाते, पोपट वाळके सर आदींनी अभिनंदन केले.

डॉ.विक्रांत विधाते यांनी ग्रँड मेडिकल मुंबई येथील मेडिकल कॉलेजमधून एमबीबीएसचे शिक्षण पूर्ण केले. अंतीम वर्षात विशेष प्राविण्यासह यश मिळविले आहे.डॉ. विक्रांतचे प्राथमिक शिक्षण गंगुबाई आनंदराव धोंडे प्रार्थमिक शाळेत तर माध्यमिक शिक्षण आष्टी येथील पं.नेहरु विद्यालयात झाले. लातुर येथील शाहु महाविद्यालयात बारावीपर्यंत शिक्षण झाले.२०१८ मध्ये झालेल्या नीट परीक्षेत बीड व लातूर जिल्ह्यात प्रथम येण्याचा मान मिळवला होता. तसेच मराठवाडा विभागात विक्रांत द्वितीय आला होता.



# मा.खा.डॉ प्रितमताई मुंडे यांचा वाढदिवस समाजोपयोगी उपक्रम राबवुन साजरा करणार -राजेश गित्ते

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

मा. खा. डॉ. प्रितमताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त मंगळवार, दि. 17 फेब्रुवारी रोजी परळी वैजनाथ येथे विविध समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती तालुकाध्यक्ष राजेश गित्ते यांनी दिली.

लोकनेत्या मा ना पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या आदेशानुसार आणि मार्गदर्शनाखाली डॉ प्रितमताई यांनी सर्वांना असे निर्देश दिले आहेत की इतर खर्च ना करता वाढदिवसानिम्मित सामाजिक उपक्रम राबवून साजरा व्हावा ही भावना व्यक्त केली.

ताई साहेबांच्या आव्हानानुसार मा.खा.डॉ. प्रितमताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले जाणार आहेत. वाढदिवस सेवा आणि सामाजिक बांधिलकी जपत साजरा करण्याचा संकल्प परळी वैजनाथ तालूका भारतीय जनता पक्षाच्या वतीने करण्यात आला आहे. वाढदिवसानिमित्त धार्मिक व सामाजिक उपक्रमांची सांगड घालण्यात आली आहे. वैद्यनाथ मंदिर येथे श्री वैद्यनाथ प्रभुस महाअभिषेकाने होणार आहे. भाविकांच्या उपस्थितीत विधिवत पूजा-अर्चा करून डॉ प्रितमताई यांच्या निरोगी आयुष्यासाठी आणि सुख-समृद्धीसाठी प्रार्थना करण्यात येणार आहे. यानंतर कन्हैया वारकरी शिक्षण संस्था परळी वैजनाथ येथे दिनांक17/02/2026 मंगळवारी सकाळी ठीक 11.00वाजता विविध समाजोपयोगी कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करून शिक्षणाला प्रोत्साहन दिले जाणार आहे. पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने शहर व परिसरात वृक्षारोपण करण्यात येईल. तसेच गरजू व निराधार बांधवांसाठी अन्नदानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, समाजातील वंचित घटकांपर्यंत मदतीचा हात पोहोचविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यासाठी विविध ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे. सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता करून नागरिकांना स्वच्छतेचा संदेश दिला जाणार आहे.

“वाढदिवस हा केवळ शुभेच्छांचा दिवस नसून समाजासाठी काहीतरी विधायक करण्याची संधी आहे. सेवा, समर्पण आणि सामाजिक जबाबदारी या मूल्यांवर आधारित उपक्रम राबवून वाढदिवस साजरा केला जात आहे,” असे त्यांनी नमूद केले.

मा. खा.डॉ. प्रितमताई मुंडे यांच्या कार्यातून प्रेरणा घेत समाजहिताचे विविध उपक्रम हाती घेण्यात येत असून, या माध्यमातून सामाजिक ऐक्य आणि जनसेवेचा संदेश दिला जाणार आहे. या सर्व कार्यक्रमांत भारतीय जनता पक्ष चे ज्येष्ठ नेते, पदाधिकारी, सरपंच, चेअरमन, शक्तिकेंद्र प्रमुख, बूथ प्रमुख, कार्यकर्ते तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन भाजपचे तालुकाध्यक्ष राजेश गित्ते आणि सर्व तालुका पदाधिकारी यांनी केले आहे.

# माय आणि मातीशी आमचं घट्ट नातं ; पशुसंवर्धनातून मोठी रोजगार निर्मिती करणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## महा पशुधन एक्सोचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल पंकजाताई मुंडे यांचे मुख्यमंत्र्यांकडून कौतुक

## पशुसंवर्धन विभागाच्या सर्व प्रस्तावित योजनांना भरघोस निधी देण्याची मुख्यमंत्र्यांची ग्वाही

## मुख्यमंत्री पशुधन उद्योग योजना प्रभावीपणे राबवणार - ना पंकजाताई मुंडे

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

माय आणि मातीशी आमचं घट्ट नातं आहे. आपल्या संस्कृतीमध्ये जे काही चक्र आहे ते सर्व पर्यावरण पूरक आणि नैसर्गिक साखळीला अनुसरूनच आहे. पशुसंवर्धना च्या माध्यमातून येणाऱ्या काळात मराठवाडा विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्रात नवनवीन प्रयोग, अनुसंधान साधून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मितीसाठी राज्य सरकार कटिबद्ध आहे. पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी प्रभावीपणे काम सुरू केले असून पशुसंवर्धनातून रोजगार निर्मितीसाठी पशुसंवर्धन विभागाच्या सर्व प्रस्तावित नवनवीन योजनांना भरघोस निधी दिला जाईल अशी ग्वाही राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी परळी वैजनाथ येथील महा पशुधन एक्सपो च्या समारंभात दिली. तर भारतात पशुपालनाला कृषीचा दर्जा देणारे, अतिशय जबाबदार मुख्यमंत्री आपल्याला लाभले असून येणाऱ्या काळात पशुसंवर्धन विभागाच्या माध्यमातून नवउद्योजक तयार करण्यासाठी मुख्यमंत्री पशुधन उद्योग योजना प्रभावीपणे राबविणार असल्याची माहिती पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी दिली.


पशूसंवर्धन विभागाच्या वतीने महाशिवरात्रीचे औचित्य साधून ना. पंकजाताई मुंडे यांच्या संकल्पनेतून आणि पुढाकारातून कालपासून सुरू झालेल्या राष्ट्रीय स्तरावरील महा पशुधन एक्सपोचा मुख्य समारंभ आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. एक्सपो मधील विविध स्टॉल्सना भेट देत मुख्यमंत्र्यांनी पाहणी केली. व्यासपीठावर ना. पंकजाताई मुंडे यांच्यासह माजी मंत्री आ. धनंजय मुंडे, आ. रत्नाकर गुट्टे, माजी आमदार बदामराव पंडित,माजी आमदार गोविंद केंद्रे, संजय दौंड, परळीच्या नगराध्यक्षा पद्मश्रीताई धर्माधिकारी , गेवराईच्या नगराध्यक्षा गीता भाभी पवार , गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा,अक्षय मुंदडा पशुसंवर्धन विभागाचे



सचिव डॉ. रामास्वामी एन, प्रवीण कुमार देवरे डॉ. मुकणे, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कावत, भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख आदींसह नेतेगण, वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

■ **पशुसंवर्धनातून ग्रामीण अर्थकारणाला गती - ना.पंकजाताई मुंडे**

यावेळी बोलताना ना.पंकजाताई मुंडे यांनी सांगितले की, ज्याप्रमाणे मुख्यमंत्री ग्रामसडक योजना असो किंवा जलस्वराज्य योजना असो या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नाव ग्रामीण महाराष्ट्रात कोरले गेले आहे. पशुसंवर्धन विभागाच्या माध्यमातूनही आपल्याला प्रभावीपणे काम करून दाखवायचे आहे. ग्रामीण महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी शेतकरी व पशुपालकांच्या माध्यमातून रोजगार निर्मितीचे ध्येय घेऊन पशुसंवर्धन विभागाच्या वतीने प्रभावीपणे काम करण्यासाठी मुख्यमंत्री खंबीरपणे आपल्या पाठीशी आहेत. देशात पशुसंवर्धनाला कृषीचा दर्जा देणारे पहिले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली पशुसंवर्धना च्या माध्यमातून महाराष्ट्राचा आर्थिक विकास करण्याची आपली संकल्पना आहे. पशुपालनातून तरुणांना रोजगारक्षम आणि उद्योगी बनविण्यासाठी मुख्यमंत्री पशुधन उद्योग योजना प्रस्तावित केली आहे या योजनेला मंजुरी मिळाल्यानंतर ही योजना प्रभावीपणे राबवून राज्यात मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होणार आहे. राज्याच्या जीडीपी मध्ये वाढ करण्यासाठी यातून पशुसंवर्धन विभाग निश्चितपणाने योगदान देणार आहे. ग्रामीण भागातील 24 लक्ष तरुणांना उद्योजक बनविण्याची ही योजना आमच्याकडे आहे. दूध उत्पादनामध्ये देशात पाचव्या क्रमांकावर असलेला महाराष्ट्र ही या माध्यमातून पुढे घेऊन जाण्याचा आमचा प्रयत्न राहणार असल्याचे पंकजाताई मुंडे यांनी सांगितले. पशुसंवर्धन विभागाच्या माध्यमातून रोजगार निर्मिती आणि आर्थिक विकासाला मोठ्या प्रमाणावर चालना देऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नाव महाराष्ट्राच्या मनामनात कोरले जाईल असे काम प्रामाणिकपणे आपण करणार असल्याचे यावेळी पंकजाताई मुंडे यांनी सांगितले.



### मुख्यमंत्र्यांनी केले पंकजाताईंचे भरभरून कौतुक

यावेळी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, पर्यावरण व पशुसंवर्धन विभागाच्या मंत्री म्हणून पंकजाताई मुंडे यांनी चांगले व प्रभावी काम सुरू केले आहे. शेती आणि शेतीपूरक व्यवसायांसाठी राज्य सरकार खंबीरपणे त्यांच्या पाठीशी राहणार आहे. आपलं नातं हे माय आणि मातीशी घट्ट असून त्या दृष्टीने काम करण्याचा आपल्या सरकारचा संकल्प आहे. आपल्या संस्कृतीनेच आपल्याला निसर्ग, माती, पशु, वनस्पती यांच्याशी जोडलेले आहे. त्यामुळे आपल्या प्रत्येक देवते सोबत पशु आणि वनस्पती यांचे अवतार आपल्याला बघायला मिळतात. आजच्या आधुनिक काळामध्ये माय आणि माती यांच्याशी तुटत चाललेली नाळ सांगड घालून पुन्हा जोडण्याच्या दृष्टिकोनातून पशु संवर्धनाचा विषय अतिशय महत्त्वाचा आहे. या माध्यमातून शेतकरी समृद्ध, संपन्न होणार आहे. मराठवाडा ,विदर्भ व उर्वरित महाराष्ट्रामध्ये पशुसंवर्धन विभागाच्या माध्यमातून येणाऱ्या काळात पशुसंवर्धन विभागाच्या वतीने प्रस्तावित करण्यात आलेल्या सर्व योजनांना प्रोत्साहन देण्यात येईल. त्यासाठी आवश्यक भरघोस निधीची तरतूद आपले सरकार निश्चित करणार आहे. नैसर्गिक शेती, पशुसंवर्धन त्यातून रोजगार निर्मिती नवनवीन संशोधन, वेगवेगळ्या दुग्ध वाढीच्या उपक्रम सरकार प्रभावीपणे राबवणार आहे. येणाऱ्या काळात वैरण विकास हा कार्यक्रम आपल्याला हातात घ्यायचा आहे. यासाठी पंकजाताई मुंडे प्रभावीपणे निश्चित काम करतील अशी आपल्याला खात्री असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. पंकजाताई मुंडे यांनी महा पशुधन एक्सपो अतिशय सुरेख व सुंदर आयोजित केला. या महा एक्स्पोच्या माध्यमातून नवनवीन प्रयोग, पशुपालन विषयक नवीन माहिती विविध जातीवंत पशुपालनाच्या संकल्पना या प्रत्येकाने समजून घेतल्या पाहिजेत. यातूनच खऱ्या अर्थाने विकासाला चालना मिळणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.



■ **मुख्यमंत्र्यांच्या हस्ते विविध पारितोषिके, अनुदान वितरित**

महा पशुधन एक्स्पो 2026 मध्ये महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) अंतर्गत पात्र महिला बचत गटांना प्रतिनिधिक स्वरूपात कर्ज वितरण केले. ग्रामीण जीवनोन्नती अभियान उमेदच्या स्मार्ट प्रकल्पांतर्गत 'उमेद सखी महिला शेतकरी उत्पादक कंपनीला अनुदानाच्या बारा लाख 27 हजार 500 या पहिल्या हप्त्याचे वितरणही मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. पशुसंवर्धन विभागाच्या 'महापशुधन वार्ता' या मासिकाच्या दहाव्या अंकाचे तसेच विभागाच्या दिनदर्शिका 2026 चे अनावरण करण्यात आले.परळी वैजनाथ येथील डॉ. भालचंद्र सार्वजनिक वाचनालयाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ऑनलाईन लोकार्पण झाले. त्याचबरोबर भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी राज्यस्तरीय पशुरोग अन्वेषण प्रयोगशाळा पुणे च्या फिरत्या प्रयोगशाळेचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते यावेळी करण्यात आला. पशुप्रदर्शनातील विविध स्पर्धांमधील पशुपालकांना बक्षिसांचे वितरण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले.

# वैद्यनाथ महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींची कराटे स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी



**परळी | प्रतिनिधी**

परळी येथील वैद्यनाथ महाविद्यालयाच्या दोन विद्यार्थिनींनी कराटे स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन करत महाविद्यालयाच्या नावलौकिकात भर घातली आहे. बी.एस्सी. तृतीय वर्षाच्या कु. अमृता मनोहर काळे व कु. वैष्णवी वैजनाथ जिगे यांनी 26 वी ऑल महाराष्ट्र ओपन कराटे चॅम्पियनशिप 2026 या स्पर्धेत रौप्य पदक पटकावले.

ही स्पर्धा एशियन शितो रिव्ह स्पोर्ट्स कराटे डू असोसिएशन व मुंबई स्पोर्ट्स कराटे असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने पवई, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. राज्यभरातून मोठ्या संख्येने स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. अत्यंत चुरशीच्या सामन्यांमध्ये उत्कृष्ट कौशल्य, चिकाटी व आत्मविश्वासाच्या जोरावर दोन्ही विद्यार्थिनींनी रौप्य पदकावर आपले नाव कोरले.

या उल्लेखनीय यशाबद्दल महाविद्यालयातर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी वैद्यनाथ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. व्ही. जगतकर, उपप्राचार्य डॉ. व्ही. बी. गायकवाड, प्रा. डी. के. आंधळे तसेच क्रीडा विभागाचे संचालक प्रा. डॉ. पी. एल. कराड , शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख प्रा. डॉ व्हि.व्हि. बेंडसुरे आणि प्रा. विजय मुंढे उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. जगतकर यांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन करत पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या व इतर विद्यार्थ्यांनीही त्यांच्या कामगिरीतून प्रेरणा घ्यावी, असे आवाहन केले.

विद्यार्थिनींच्या या यशामुळे महाविद्यालया व सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# शेतकऱ्यांसह जनतेची परत दिशाभूल

## कथनीवर भर आणि करणी शून्य- किसान सभा

**परळी | प्रतिनिधी**

अमेरिकेसोबत झालेल्या करारांतर्गत भारतीय कृषी बाजारपेठ ही अमेरिकेकरिता खुली करण्यात आलेली नसल्याचे सांगत शेतकऱ्यांची दिशाभूल करण्याचा केविलवाणा प्रयत्न राज्याचे प्रमुख पालकत्व असलेले मुख्यमंत्री मा देवेंद्र फडणवीस यांनी करत पुढचं पाठ आणि मागचं सपाट या पद्धतीने मागच्या केलेल्या घोषणेच्या अंमलबजावणी बद्दल काहीही ठोस कृती नसताना जेव्हा येईल तेव्हा मराठवाड्याच्या विकासाबद्दल घोषणा करून जायचं असा घणाघात किसान सभेचे राज्य उपाध्यक्ष कॉ.ॲड.अजय बुरांडे यांनी केला.

परळी येथे सोमवार दि 16 रोजी आयोजित पत्रकार परिषदेत कॉ.ॲड.अजय बुरांडे यांनी सांगितले की, परळी वैजनाथ येथे आयोजित महा एक्सपो 2026 पशुप्रदर्शनात मा मुख्यमंत्री यांनी भारत अमेरिका या मध्ये नव्याने झालेला व्यापार करार याचे स्वागत करत मुख्यमंत्र्यांनी देशाचे प्रधानमंत्री यांचे आभार मानले आणि भारतासाठी अमेरिकेची मोठी बाजारपेठ खुली झाल्याचे सांगितले. तसेच कृषी क्षेत्रात कोणत्याही अमेरिकन मालाला भारतात खुली सूट दिली नसल्याचे या करारात लिहिले आहे असे सांगतानाच कृषी क्षेत्रा संदर्भात कसल्याही प्रकारचा समझोता झाला नसल्याचे सांगत काही लोक जाणीवपूर्वक अफवा पसरून कृषी मालाचे मूल्य पाडत



असल्याचे ठणकावून सांगितले.

मात्र इथेनॉल, भारतात बंदी असलेल्या जीएम सोयाबीन पासून तयार केलेले खाद्यतेल, सोयापेंड, पशुखाद्य, स्पिरिट, सुकामेवा, फळे, भाज्या व पोल्ट्री कृषी मालावर प्रक्रिया करून तयार केलेले अन्नपदार्थ यासाठी तूर्तास अमेरिकन मालास आयात शुल्कात भारतीय बाजारपेठ खुली करून दिली आणि याच वेळी भारतीय मालावर मात्र 18 आयात शुल्क आकारले. भारतीय कृषी बाजारावर याचा परिणाम होणार नसल्याचे मुख्यमंत्र्यांनी पदग्रहणाच्या वेळी घेतलेल्या शपथीचे स्मरण करून सत्य स्पष्ट करावे. एका बाजूला पर्यावरण, निसर्ग आणि नैसर्गिक साधन संपत्तीचे गुणगान गात दुसऱ्या बाजूला उद्योगपत्यांना खाणीसाठी, बंदरासाठी जंगल, जल, जमीन पर्यायी पर्यावरणाचा सगळ्यात मोठा नाश या दहा वर्षाच्या काळामध्ये झालेला आहे.

सोयाबीनचा अफवा उठून भाव पडल्याचे आरोप करताना 5330 हमीभाव असताना साडेतीन हजार रुपयांमध्ये डिसेंबर महिन्यापर्यंत हमीभावाच्या खाली ज्या शेतकऱ्यांना विकावे लागले त्यांना भावांतर योजनेतून राहत देणार आहात का? कापसाचे भाव हमीभावाच्या खाली घसरलेले आहेत हे भाव घसरवण्यामागे आपल्या धोरणाचा मोठा वाटा नाही का? मिनिमम सपोर्टिंग प्राईस ही बाजारभावाला आधार देण्यासाठी असते सीसीआय अंतर्गत शेतकऱ्यांचा खरेदी केलेला कापूस आपण शेतकऱ्यांकडील माल संपायच्या आत बाजारभावापेक्षा कमी किमतीत बाजारात विक्रीस काढल्याने कापसाचे भाव पडले असून शेतकऱ्यांना नुकसान सोसावे लागत आहे आपल्या धोरणामुळे झालेल्या या नुकसानाची भरपाई आपण भावांतर योजनेतून देणार आहात का? उत्पादन खर्च व त्यावर दीडपट अधिक भाव अशा प्रमाणे आधारभूत किंमत जाहीर करून शेतात उत्पादित झालेल्या शेतमालाची संपूर्ण खरेदी कायद्याच्या स्वरूपात हमी शेतकऱ्यांना देणार का ? मागच्यावेळी करण्यात आलेल्या मराठवाडा वॉटर ग्रीड योजनेचे कामाचे काय झाले? असे प्रश्न किसान सभेने उपस्थित केले असून याबाबत लवकर किसान सभेकडून परळीमध्ये शेतकरी परिसंवाद आयोजित करून अमेरिकेसोबत नव्याने झालेला कराराचा कृषी क्षेत्रावर व सर्व सामान्य जनतेच्या दैनंदिन जीवनात होणार विपरीत परिणाम आणि केंद्र आणि राज्य सरकारची शेती आणि शेतकरी विरोधी भूमिका आम्ही किसान सभा शेतकऱ्यांसमोर मांडणार आहे.